मनुष्याच्या जीवनाचं खरं वैभव म्हणजेच ज्ञान.'

-- श्री. शरद पारधी

बदलापूर: दि. २३.७. २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता Zoom Meeting च्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने आदर्श विद्या प्रसारक संस्थेच्या,आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुळगाव- बदलापूरच्या महिला विकास मंच(WDC), मराठी भाषा व वाङ्मय मंडळ आणि गायत्री परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने 'गुरूपौर्णिमा' साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमात प्रास्ताविकपर मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाच्या प्राचार्या, डॉ. वैदेही दप्तरदार यांनी, कविवर्य कालिदास यांच्या दोन रूपककथा सांगून गुरू- शिष्याप्रति असणारं दृढ नातं याचा परिचय करून देऊन मोलाचा संदेश दिला. तर, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आदरणीय श्री.शरद पारधी यांनी, "ज्ञान व विज्ञान यांचा समन्वय"या विषयावर मार्गदर्शन करतांना, 'विज्ञान ही ज्ञानाची शाखा आहे. जोपर्यंत स्वतःची ओळख स्वतः ला होत नाही, तोपर्यंत ज्ञान प्राप्त होणार नाही. मनुष्याची सफलता त्याच्या ज्ञानप्राप्तीवरच झाली आहे,

त्याची त्याला अनुभूती असली पाहिजे, जीवनाचा उद्देश समजला पाहिजे, दुसऱ्याला स्वतःच्या ठिकाणी ठेवून पहावे, हे माझं नाही ,ही वृत्ती असली पाहिजे. आपल्या सद्सद्विवेक बुद्धीने आपल्यासोबत दुसऱ्याचं भलं करता आलं पाहिजे'.

'भौतिक प्रगती खूप झाली असली तरी त्याला नीतिमत्तेची गरज आहे. माणसांमध्ये देवत्वाचा उदय झाला पाहिजे, गुरुच्या देवत्वाचा अंश आपल्यामध्ये असला पाहिजे. श्रेष्ठत्व येण्यासाठी उपासना-साधना-आराधना याची गरज आहे'. असे सांगून ज्ञान-अज्ञान-बोध-अनुभूती यावर त्यांनी मोलाचे विचार व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे सहसचिव, मा. प्रा. पंढरीनाथ बाविस्कर सर यांनी, कार्यक्रमाचा आढावा घेऊन आपल्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाप्रति समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमाची सुरुवात कु. साहिल विशे यांनी 'गुरू एक जगी त्राता' या सादर केलेल्या सुमधुर ईशस्तवनाने झाली. याप्रसंगी महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, गायत्री परिवाराचे पदाधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमात पाहुण्यांची ओळख गायत्री परिवाराच्या प्रा. सौ. जयश्री शिंपी यांनी केली तर सूत्रसंचालन आणि आभार मराठी विषयाचे प्रा. डॉ. संदीप भेले यांनी केले.

या मंगलप्रसंगी हरिद्वारचे कुलगुरू आदरणीय श्री.शरद पारधी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात सुमारे ११० जण सहभागी झाले होते.

Dr. SABLE

सीतेच्या वाटेला आलेलं अग्निदिव्याचं आवर्त आजही संपलं नाही.'

डॉ. पद्मरेखा धनकर

आदर्श विद्या प्रसारक संस्थेच्या,आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुळगाव- बदलापूरच्या मराठी भाषा व वाङ्मय मंडळ व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आज मंगळवार दि. २२.६. २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता Google Meet च्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने ' वाचन दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी चंद्रपूर येथील सरदार पटेल महाविद्यालयाच्या मराठी विषयाच्या प्राध्यापिका डॉ. पद्मरेखा धनकर, सुप्रसिध्द साहित्यिक व कवयित्री या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या कार्यक्रमात सुमारे २५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैदेही दप्तरदार यांनी साहित्य हे वाचकाला माणसं वाचायला शिकवतं, साहित्य जीवनाला कलाटणी देणारं असतं, साहित्यातून माणसानं आत्मभान शोधायला हवे, वाचन हे वाचनासाठी नसून जीवनासाठी संदेश असतो, असे सांगितले तर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. पद्मरेखा धनकर यांनी महाकाव्यातील स्त्री प्रतिमा सीता या व्यक्तिरेखेबद्दल तिचे जीवन, तिच्या वाट्याला आलेले सुख- दुःख, स्त्रीचं सामर्थ्य उलगडून दाखविले. आजही देवी, उदत्तता , चारित्र्य शुद्धतेच्या नावाखाली स्त्री होरपडळतांना दिसते, सीतेच्या वाटेला आलेलं अग्निदिव्याचं आवर्त आजही संपलं नाही.'आजही पुरुषी मानसिकतेचे दर्शन जागोजागी घडते. असे विचार व्यक्त केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विषयाचे प्रा. डॉ. संदीप भेले यांनी केले.

(सदर कार्यक्रम हा ऑनलाईन पद्धतीने घेण्यांत आला होता)

Dr. S. Bhele

आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे,

आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुळगांव-बदलापूर.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा*

मराठी भाषा व वाङ्मय मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्ताने आयोजित दि. २५ जानेवारी २०२२ रोजी मा. सौ. मीनाताई देशपांडे यांचे कथाकथन तर दि. २७ जानेवारी २०२२ रोजी प्रा. कोमल ठाकरे यांचे निवेदन कौशल्य: स्वरूप, तंत्र व संधी याविषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यांत आले होते या प्रसंगी मा. प्राचार्या, डॉ. वैदेही दप्तरदार , शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग सहभागी होता. वरील दोन्ही कार्यक्रम झूम अँपचा वापर करून ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आले होते

प्रा. डॉ. संदीप भोळे
मराठी भाषा व वाङ्मय मंडळ

आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे

आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय

कुळगाव - बदलापूर.

भाषा ही नदीसारखी असते, वाहाती राहिली तरच टिकते. - डॉ. देवानंद सोनटक्के.

बदलापूर येथील आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयात दिनांक २४ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२२ यादरम्यान मराठी भाषा गौरव दिनानिमित्त त्रिदिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

पहिल्या दिवशी 'भाषा व साहित्य' या विषयावर डॉ. देवानंद सोनटक्के, दुसऱ्या दिवशी संतपरंपरा : मराठी संस्कृतीचा कणा' या विषयावर मा. श्री. सचिन परब आणि तिसऱ्या दिवशी मराठी भाषेतील पत्रकारिता' या विषयावर मा. श्री. प्रमोद चुंचुवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. 'भाषा व समाज यांच्यातील परस्परसंबंध उलगडून दाखविताना "भाषा ही नदीसारखी असते, वाहाती राहिली तरच टिकते. " असे डॉ. देवीनंद सोनटक्के यांनी महत्त्वपूर्ण विधान केले. तसेच संतपरंपरेने मराठी मन घडविताना कोणते योगदान दिले, याविषयी मार्गदर्शन करताना 'कर्मे इशु भजावा' हे संत ज्ञानेश्वरांचे वचन उलगडून सांगितले व प्रत्येकाने आपापल्या कार्यक्षेत्रात सचोटीने कार्य करीत राहिले पाहिजे, ही अपेक्षा व्यक्त केली तर 'मराठी भाषेतील पत्रकारिता' याविषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना इ.स.१८३२ पासून सुरू झालेल्या मराठी पत्रकारितेतील १९० वर्षांच्या स्थितिगतीचा आढावा घेतला. त्यात त्यांनी 'मराठी पत्रकारितेने स्वातंत्र्यपूर्व काळापासून समाजप्रबोधनाचे कार्य करताना लोकचळवळ उभी केली. पण आजच्या बदलत्या काळात मराठी पत्रकारिता टिकावी, यासाठी मराठी वाचकांनीच लोकचळवळ उभी करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे' असे अत्यंत परखडपणे मतप्रतिपादन केले.

तीनही दिवसांच्या व्याख्यानांच्या कार्यक्रमांचे अध्यक्षस्थान भूषविणाऱ्या आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैदेही दप्तरदार यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. "मातृभाषेतूनच माणसांवर- समाजावर संस्कार घडतात, म्हणून आपली मायमराठी भाषा टिकविली पाहिजे", अशी मातृभाषेची महत्ता त्यांनी प्रतिपादिली. तसेच "ज्ञानाचे, पैशाचे असे कोणतेही धन प्राप्त करायचे असेल तर तुमच्या उत्तम व्यवहारातून प्राप्त होते." हे संत तुकारामांच्या 'जोडोनिया धन। उत्तम व्यवहारे। उदास विचारे। वेंच करी।।' या अभंगाचा दाखला देऊन स्पष्ट केले. तसेच 'अभ्यासोनि प्रकटावे' या रामदासांच्या वचनातून आपल्या लिहिण्या- बोलण्याच्या अभिव्यक्तीला अभ्यासाची, पुराव्यांच्या आधाराची कशी आवश्यकता असते, ही शिकणूक तर मिळतेच पण रामदासांच्या ग्रंथांचा अभ्यास केला तर काय खावं,काय प्यावं, काय ल्यावं, अशा छोट्या छोट्या दैनंदिन व्यवहाराविषयीचे पर्यावरणसुसंगत ज्ञानही मिळते," असे प्राचार्या डॉ. वैदेही दप्तरदार यांनी संतसाहित्यातून घडणारे संस्कार अधोरेखित केले. याशिवाय "आजच्या मराठी पत्रकारितेने आपली जबाबदारी ओळखून तिचे वहन केले पाहिजे." असे डॉ. वैदेही दप्तरदार यांनी भारतरत्न राहूल बजाज यांच्या मृत्यूच्या बातमीची फारशी दखल न घेणाऱ्या माध्यमांच्या कृतीवरून स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, वक्त्यांचा परिचय डॉ. संदीप भेले यांनी करून दिला तर आभार प्रदर्शन अनुक्रमे प्रा. सुमित्रा शिंदे -मोरे, डॉ. प्रतिभा टेंबे व डॉ. संदीप भेले यांनी केले. व्याख्यानमाला यशस्वी व्हावी, म्हणून प्राचार्यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवर्ग आणि कार्यालयीन कर्मचारी वर्ग तसेच विद्यार्थिवर्ग यांनी आपला सक्रिय सहभाग नोंदविला.

प्रा.डॉ. संदीप भेले
मराठी भाषा व वाङ्मय मंडळ